जावक क्र. ५२/२०२५/२६ 					१८/८/२०२५

प्रति.

माननीय.

प्राचार्य डॉ प्रशात शेलार

जे.ई.एस महाविदयालय.

जोगेश्वरी [ पू ]

मुंबई क्र. ६०

विषय - राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उत्तम प्रकारे आयोजन केल्याबददल आभार पत्र.

मा. महोदया.

आमच्या गावात आपल्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजने [NSS Unit ] अंतर्गत दिनांक २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२४ या सात दिवसाच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. आपण प्राचार्य असूनही स्वत: जातीने हजर राहून राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातील स्वयंसेवकांना सामाजिक कार्याची ओळख करून दिलीत आणि ते सामाजिक कार्य त्याच्या हातून यशस्वीरीत्या पार ही पाडले
आपल्या या सात दिवसाच्या उपक्रमात गावच्या समस्येकडे जवळून पाहून जनजागृतीसाठी पथनाट्य सादर केलेत. तसेच आरोग्य तपासणी शिबीर,रक्तदान शिबीर ,नवीन आधार कार्ड बनवणे जुन्याचे नुतनीकरण करणे या सारखे उपक्रम गावच्या लोकासाठी राबवलेत. ग्रामपंचायत व शाळेच्या बाहेरील आवाराची स्वच्छता बरोबरच आपल्या संस्थेचे मानद सचिव श्री किरण कामात ह्यांच्या हस्ते वृक्षारोपण केले. शाळकरी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्याच्या आनंदासाठी खाऊ वाटपा सोबत त्यांना शालेय उपयोगी वस्तू [दप्तर] ही भेट म्हणून दिलेत. गावातील स्वच्छते बरोबर गावातल्या मंदिराचे ही सुशोभीकरण केलेत भजन कीर्तनासोबत गावातील लहान मुलासाठी आणि गावातीलही मुलांनी तुमच्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले येथील आश्रम शाळेला भेट दिली त्यांनाही खाऊचे वाटप केले व त्याच्याशी गप्पा गोष्टी केल्या. येथील आरोग्य केंद्राला भेट दिली असे अनेक उपक्रम यशस्वीरीत्या राबवले .

या सात दिवसाच्या शिबिरात आमच्या कोकणेर गाव जिल्हा पालघर या छोट्याश्या गावात शिबिराच्या निमित्ताने मान्यवर लोकांनी येऊन आमचे हे गाव जवळून पहिले आमच्या गावच्या ग्रामपंचायतीच्या कार्याला फ्रीज भेट म्हणून दिलात .

आपली सामाजिक कार्याची व आमच्या गावा बददलची ओढ पाहता महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ प्रशात शेलार,उपस्थित प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक विद्यार्थी या सर्वांचे गावची सरपंच या नात्याने आभार व्यक्त करते आमच्या या लहानश्या गावाची आपल्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजने [NSS Unit] अंतर्गत शिबिरासाठी निवड केलीत या बददल आभार तसेच भविष्यात ही सहकार्य अपेक्षित आहे .

----धन्यवाद----

आपली विश्वासू

MBhad

सरपंच

ग्रामपंचायत कोकणेर